ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

Hi-Tech Research Analysis

Scanned with OKEN Scanner

मोडीलिपि महासंघ

ISSN 2231- 6671

IMPACT FACTOR
5.80

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XVIII, Vol. - II
Year - IX, (Half Yearly)
Aug. 2019 To Jan. 2020

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Scanned with OKEN Scanner

Issue : XVIII, Vol. II
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Biological control of leaf blotch diseases of Turmeric [ Curcuma longa L ] caused by Taphrina maculans. in Latur Dist. **J. A. Kadam** | 1 |
| 2 | Analysis of Food Safety Program **S. N. Shinde** | 7 |
| 3 | How to Write a Research Paper (Thesis) **Dr. H. W. Kulkarni** | 14 |
| 4 | Scientific Marketing of Agricultural Produce **Dr. Nilam Chhangani** | 17 |
| 5 | The Study of Satyajit Ray's Danger in Darjeeling with Respect to Mieke Bal's Theory of Narrative **Anant J. Somuse** | 20 |
| 6 | Yoga for Sports Performance **Dr. Dr. B. N. Bapat** | 25 |
| 7 | नियोजन, मनुष्यबळ व शेती संबंधीने यशवंतराव चव्हाणाचे मत ही आजची गरज **डॉ. दिलीप पांडुरंग महाजन** | 34 |
| 8 | भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल : एक समस्या **डी. पी. कांबळे** | 40 |
| 9 | रक्त शर्करा ठेवण्यासाठी योगासाची उपयुक्तता **डॉ. अनिल पाटील** | 44 |
| 10 | रक्ताभिसरण दमदारपणा व योगाभ्यास यांचा सहसंबंध **डॉ. जी. एम. तोगरे** | 48 |
| 11 | महिलांच्या शारीरिक वेग या घटकावर योग प्रशिक्षणाचा होणाऱ्या परिणामाचा अभ्यास **डॉ. प्रविण पी. दिग्रसकर** | 52 |
| 12 | शारीरिक फिटनेसला मदत करणारे घटक **डॉ. उत्तम धुमाळ** | 56 |



Scanned with OKEN Scanner

7

# नियोजन, मनुष्यबळ व शेती संबंधीने यशवंतराव चव्हाणाचे मत ही आजची गरज

**डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एस. पी. एम. तात्यासाहेब महाजन कला व
वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि. बुलढाणा

**Research Paper - Economics**

**प्रस्तावना :**

नियोजनाचा अर्थ शास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेण्यापेक्षा नियोजनाच्या पाठीमागे दोन तत्व आहेत ते समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्याची एक बाजू देशात उपलब्ध असणारी साधने त्या साधनाचा परिपूर्ण उपयोग इ.चा विकास करून मानवी जीवनाला अर्थात आपणा सर्वांच्या जीवनाला समृध्द बनविणे यासाठी नियोजनाद्वारे प्रयत्न केला जातो किंवा नियोजन एक माध्यम आहे. तसेच या नियोजनाच्या माध्यमातून जी शक्ती, सामर्थ्य, संपत्ती निर्माण होईल याचा फायदा सर्वसामान्य माणसाला मिळेल याचीही काळजी नियोजनाने घेणे गरजेचे आहे. याचा अर्थ देशात उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करून तसेच त्या साधनसामग्रीचा उपयोग करून मानवी जीवन समृध्द करणे याचा अर्थ मानवाच्या दरडोई उत्पन्नात वाढ करणे व त्याला पूर्वीपेक्षा चांगले राहणीमान जगता आले पाहिजेत याचा अर्थ पूर्वीपेक्षा वस्तूची प्रत चांगली व जीवन जगण्यासाठी जेवढे आवश्यक आहे तेवढे उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होणे अपेक्षित आहे याचा अर्थ नियोजनापासून आर्थिक विषमता निर्माण होऊन समाजात आर्थिक विषमतेची दरी निर्माण होऊन एकीकडे दारिद्र्य व दुसरीकडे श्रीमंत अशी अवस्था निर्माण होऊ नये. पण त्यांना अभिप्रेत असलेले नियोजनाचे फायदे त्यानंतर जनतेला मिळालेले नाहीत हे वास्तविक आहे कारण भारतात नियोजन काळात विकासाबरोबर आर्थिक विषमता वाढत गेलेली दिसून येते.

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या बाबतीत विचार मांडताना महाराष्ट्रात दोन बाबींची उपलब्धता आहे एक जमीन, पाणी, जमीनीखालचे खनिज पदार्थ तर दुसरे मनुष्यशक्ती किंवा श्रमशक्ती. या असणाऱ्या साधनाचा पूरेपूर उपयोग करून घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचे जुने चित्र आता राहिलेले नाही म्हणजे सिंहगड, प्रतापगड, शिवनेरी वरचा महाराष्ट्र असे चित्र नाही. सध्याचा

महाराष्ट्र खेड्यापाड्याचा, जमीन जुमल्यात, ऊस, कापूस, जोधळा, शाळू पिकतो आहे. व यासाठी उपलब्ध असणारे पाणी याचा विचार करता जमीन, पाणी या बाबी मर्यादित आहेत याचा उपयोग पुर्णपणे झालेला नाही त्याचा उपयोग पुढे पाच, दहा, पंधरा वर्षात होणे गरजेचे आहे. सद्य परिस्थितीत शेती आहे पण पाणी नाही अशी महाराष्ट्राची स्थिती आहे. तसेच उपलब्ध असणारे पाणी महाराष्ट्रात विभागवार वेगवेगळे आहे. मराठवाडा व विदर्भात परिस्थिती अतिशय विदारक आहे. तर पश्चिम महाराष्ट्र, कोकणाची परिस्थिती वेगळी आहे. त्यातल्या त्यात निसर्गाची अवकृपेमुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न शाश्वत राहिलेले नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करताना दिसत आहे व यात घट होण्याऐवजी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढतांना दिसत आहे. ही अतिशय चिंतेची व पुरोगामी महाराष्ट्राला न शोभणारी बाब आहे त्यासाठी जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून पुरेशा व वेळेवर शेतीला पाणी पुरवठ्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे ही एक बाब व त्याही पेक्षा चिंताजनक बाब म्हणजे मागच्या पंधरा वर्षाच्या काळात महाराष्ट्राच्या जलसिंचनावर कोट्यावधी रुपये खर्च होऊनही जलसिंचनात एक टक्काही वाढ झालेली नाही ते १७ प्रतिशत एवढेच आहे. तर त्यातही ते विभागवार वेगवेगळे आहे.

यशवंतराव चव्हाण साहेबांचे दुसऱ्या साधन्संपत्तीचे बाबतीत जी भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे ती म्हणजे मनुष्यबळ होय. व हे मनुष्यबळ परीश्रम करणारे आहे. अर्थात सर्वच माणसे काम करणारे आहेत असे नाही तर काही आळशी माणसे असतीलही त्याबद्दल काही बोलण्याची गरज नाही. पण खेड्यापाड्यातील पावसात शेतीत काम करणारा माणूस आळशीपणामुळे घरी बसून राहणार नाही. श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजेत. असे मत होते. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी माणसे पाहून नियोजन केले पाहिजेत जशी छोटा शेतकरी, शेतमजूर, गिरणी कामगार, छोटा तंत्रज्ञ, हुशार पंडीत इ. या सर्व मनुष्यबळाचा विकास होण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. गरीब व श्रीमंताच्या मुलाला शिक्षण मिळाले पाहिजेत जे चांगले आहे त्याला जास्तीत जास्त वाव मिळाला पाहिजे. शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मुलभूत साधन आहे. भारतात बुध्दीवान, विचारवंत, इंजिनिअर, डॉक्टर भरपूर प्रमाणात उफलब्ध आहेत याचा अर्थ मनुष्यबळ जबरदस्त उपलब्ध आहे. शेतीचा विकास होण्यासाठी शेतीत बिजली नेण्याची गरज आहे. तसा मनुष्यबळाचा विकास होण्यासाठी शिक्षणाची आश्यकता आहे. त्यानंतरचा प्रश्न शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. देशातील किंवा राज्यातील समाज उपयोगासाठी साधनाचा वापर करण्याची शक्ती मुलामध्ये येईल अशा तऱ्हेने मुलगा शिक्षण घेतो किंवा नाही हे पाहण्याचे काम तुम्हा आम्हाला करावे लागले हे महत्त्वाचे आहे. आणि ही सर्वात गंभीर समस्या महाराष्ट्रात आहे.

शेती संबंधाचे हुबेहुब वर्णन केलेले दिसून येते महाराष्ट्रात सह्याद्रीच्या पलीकडची जमीन म्हणजे कोकणातला कातळ, नद्याच्या काठचा सुपीक भाग सोडला तर कमी पावसाचा भाग सुरु

होतो. मराठवाड्यात गोदावरी काठचा भाग चांगला. विदर्भात जमीन चांगली पण पाठबंधाऱ्याची शक्यता कमी. पाणी आहे तिचे वापरण्याची शक्यता कमी व पाणी नाही तेथे वापरण्याची शक्यता जास्त असे कोकण व विदर्भ. म्हणून महाराष्ट्रात जमीनीची व पाण्याची मर्यादा आहे.

शेतीच्या सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जमिनीची मालकी जी असमान आहे त्यासंबंधी कमाल जमीनधारणा कायद्याचा विचार अथवा मर्यादित स्वरुपाची कमाल मर्यादाच आपणास स्विकारावी लागेल तसेच भूमिहीनाचा प्रश्न वेगळाच आहे हा प्रश्न सोडविण्यासाठी जंगलखात्याची आणि महसूल खात्याची जमीन भूमिहिनांना द्यावी. तसेच महाराष्ट्रात शेतीच्या बाबतीत आणखी एक गंभीर प्रश्न आहे तो म्हणजे शेतीच्या आधुनिकीकरणाचा. या बाबतीत इतर देशाच्या मानाने आपण फार मागे आहोत. आपले राज्य पुढारलेले, प्रगतीपथावर आहे असे आपण म्हणत असलो तरी आपण मागासलेलेच आहोत. महाराष्ट्रात मुंबईशिवाय दुसरे काहीही नाही. नद्या आहेत पण छोट्या, पावसाचे पाणी चार महिने साठवून ठेवावे आठ महिने वापरावे. धरणाला विरोध होतो हे बरोबर नाही.

आताचे बाबतीत वरील बाबीचा विचार केला तर अजूनही जमिनीचे असमान वाटप व पाण्याच असमान वाटप आहे. धरणाला विरोध कायम आहे. कमाल जमीनधारणा कायदा केला तरी अंमलबजावणी नाही व कायद्यात पळवाटा आहेत. जमिनीचे आधुनिकीकरण तरी म्हणाव्या तेवढ्या प्रमाणात झालेले दिसून येत नाही. त्यातही पावसाच्या लहरीपणावर शेती अवलंबून असल्यामुळे उत्पादनात निश्चीतता नाही व जरी उत्पादन जाले तरी किंमतीचे व शेतमालाच्या हमीभावाची निश्चिती नाही. त्यामुळे आजही शेतकरी कर्जबाजारी आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला मध्यवर्ती स्थान आहे. तसेच औद्योगिकरणही शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे. तसेच शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी सुधारलेली शेती करावी तसेच शेतकऱ्यांना कर्जपुरवठा व्हावा यासाठी सोसायट्या, सहकारी सोसायट्या स्थापना करावी तसेच सहकारी शेती संस्था स्थापन कराव्यात यात जमिनीची संयुक्त मालकी असेल व त्याच्या संयुक्त व्यवस्थेखाली काम करावे लागेल.

शेतीच्या विकासासाठी कृषी उद्योग हा प्रस्न सोडवणे गरजेचे आहे. याचा अर्थ खेड्यातील सगळा समाज शेतीवर अवलंबून आहे. यातही काही भूमिहीन आहेत यामुळे समाजामध्ये अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत यासाठी भूमिहीन समाजाला शहरात गेल पाहिजेत. कृषी-उदयोगाचा विकास करण्यासाठी उत्पादनाचे नवीन तंत्र, आधुनिक साधने शेतकऱ्यांपर्यंत जाणे गरजेचे आहे. म्हणून शेतीकडे आपण उद्योग म्हणून पाहणे गरजेचे आहे. तसेच शेतीचा विकास झाला तर इतर धंदेही सुरु करता येतील या सर्वांचा परिणाम खेडे व शहर यातील जे कृत्रीम अंतर आहे ते दूर होईल. शेतीसाठी लागणारी अवजारेही खेड्यातच निर्माण झाली पाहिजेत. शेतकज्यांचे जीवन बदलण्यासाठी खेड्यात वीजपुरवठा होणे गरजेचे आहे. तसेच कृषी औद्योगिक समाज निर्माण व्हावा याचा अर्थ शेतीतून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालावर औद्योगिक प्रक्रिया करून उत्पादन खेड्यातून करावे.

Scanned with OKEN Scanner

खेड्यापर्यंत वीज गेली पाहिजेत हा विचार सुरुवातीला लेनीन यांनी मांडला त्यासाठी जगात जे चांगले विचार आहेत ते आपण स्विकारले पाहिजेत. त्यासाठी शेतीच्या विकासासाठी कृषी-उद्योग प्रधान अर्थरचना ही असली पाहिजेत. यासाठी कृषी औद्योगिक समाज निर्माण होणे गरजेचे आहे.

या वरील बाबीचा आपण आजच्या परिस्थितीत विचार केला तर शेतीचा विकास झाला उत्पादकता वाढली पण शेतकरी गरीब किंवा दारिद्र्यात राहिला कृषी उद्योग ही संकल्पना साकार होऊ शकली नाही कारण आज शेतीतून उत्पादीत झालेल्या कच्या मालाचे पक्क्या वस्तूत रुपांतर करणारे कारखाने हे शहरातच आहेत. त्यामुळे खेडे व शहर यांच्या किंवा उद्योगपती व शेतकरी यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी वाढत जातानाच दिसून येते. तसेच सूतगिरण्या, साखर कारखाने जरी खेड्यात निघाले असले तरी तेही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देताना दिसून येत नाही.

सहकारी चळवळीची मत मांडताना ती लोकशाहीची चळवळ आहे पक्षाची नाही यातून शोषिताचा फायदा व्हावा असे मत होणे म्हणजे कृषी उद्योग-सहकार यातून समाजवादी समाजरचना निर्माण करावयाची होती.

**निष्कर्ष :**

१) नियोजनात बाबतीत सर्वात महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे जी साधने आहेत त्याचा उपयोग जास्तीत जास्त करून आमचे जीवन समृध्द झाले पाहिजेत. व त्याचा फायदा सर्वसामान्य माणसाला मिळाला पाहिजेत.

२) भारतात व महाराष्ट्रात कोणती साधने आहेत ती म्हणजे एक शेती व दुसरे मनुष्यबळ, शेतीचा विकास हा पाण्यावर किंवा जलसिंचनाच्या सुविधावर अवलूंन आहे. या सुविधा महाराष्ट्रात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या आहेत. हे पाणी मर्यादित आहे. त्याचा उपयोग व्यवस्थित होणे गरजेचे आहे.

देशात व महाराष्ट्रात मनुष्यबळ उपलब्ध आहे. पण ते आळसी आहेत असे म्हणणे चुकीचे आहे कारण वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे मनुष्यबळ उपलब्ध आहे याचा विकास शिक्षणावर अवलंबून आहे म्हणून गरीब व श्रीमंत या दोघांनाही शिक्षण मिळाले पाहिजेत व ते शिक्षण राज्यातील समाजोपयोगी साधनाचा वापर करण्याची शक्ती मुलामध्ये येईल असे शिक्षण असावे.

३) जमिनीचे असमान वाटप हे अतिशय गंभीर बाब आहे यासाठी मर्यादित स्वरुपाची कमाल मर्यादाच जमिनीच्या बाबतीत असावी तसेच भूमिहिनांना जंगलखात्याची व महसूल खात्याची जमीन देण्यात यावी.

४) जमिनीत उत्पादनात वाढ करण्यासाठी आधुनिकीकरण आवश्यक आहे. तसेच पाणीपुरवठ्याच्या सोयी असणे गरजेचे आहे. यासाठी धरणाला विरोध करणे चुकीचे आहे.

Scanned with OKEN Scanner

५) शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी शेती आधुनिक पध्दतीने करावी शेतकऱ्यांनी सुधारलेली शेती करण्यासाठी गावात सेवा सहकारी सोसायट्याची स्थापना करावी. तसेच सहकारी शेती संस्था स्थापन कराव्यात.

६) कृषी-उद्योग हा मुलभूत प्रश्न सोडवण्यासाठी शेतीत उत्पादनाचे नवे तंत्र व शेती आधुनिक पध्दतीने करावी याचा अर्थ शेतीकडे उद्योग म्हणून पाहावे तसेच शेतीचा विकासावर उद्योग अवलंबून असतात म्हणून शेतीच्या विकासामुळे उद्योगांचा विकास होईल त्यामुळे खेडे व शहर यातील अंतरही कमी होईल.

७) शेतीसाठी लागणारी अवजारे जसे नागर हे खेड्यातच निर्माण व्हावेत व शेतीतून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योगही खेड्यातच उभारावेत.

८) शेतीचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी खेडे गावातील जमिनीचे फेरवाटप, कमाल जमीन मर्यादा, कुळकायदा, खेड्यात उद्योग, शेतीला पाणीपुरवठा व वीजपुरवठा या सुविधा पुरवल्या पाहिजेत तरच सर्वांगिण विकास होईल या विचारामुळेच महाराष्ट्रातील शेतीच्या उत्पादनात वाढ यशवंतरावाच्या विचारामुळे शक्य झाली.

**सारांश :**

जमीन सुधारणा करण्यासाठी त्यांनी मांडलेली कृषी-औद्योगिक समाजरचनेची संकल्पना अतिशय मोलाची ठरली. शेतीचा विकास करण्यासाठी पाणी, वीज, कारखाने, अतिशय महत्त्वाचे आहेत. जमीन नसणाऱ्यांना जंगलव्याप्त जमीन देवून मालकी हक्क द्यावा तसेच जमिनीचे वाटप योग्य प्रमाणात व्हावे यासाठी कुळकायदा कमाल जमीन धारणा कायदा, शेतीचे आधुनिकीकरण, त्याचा परिणाम, खेडे व शहर यातील अंतर कमी होईल. उद्योगाचा खेड्यात विकास व्हावा, सहकार क्षेत्रात विकास व्हावा व याचा फायदा शोषितांना व्हावा हे अतिशय मोलाचे समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठीचे विचार मांडलेले आहेत. मनुष्यबळ आणि शेती विकास याची सांगड घालून शिक्षण गरीब व श्रीमंतांना दोघानाही मिळावे व त्याचा फायदा यांत्रिक प्रगती करण्यासाठी व्हावा असे मत मांडले म्हणून महाराष्ट्र भारतात अग्रेसर राज्य राहण्याचे एकमेव कारण ते म्हणजे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण साहेबांनी केलेल्या कामगिरीकडे जाते. सद्य परिस्थितीने पुढाऱ्यांनी किंवा राजकारणी मंडळीने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून जर त्यांच्या आत्महत्या थांबवता आल्या तर ती सर्वात मोठी श्रध्दांजली यशवंतराव चव्हाण साहेबांना होईल.

Scanned with OKEN Scanner

IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan.2020


## संदर्भ सूची :-

१) कृष्णकाठ, यशवंतराव चव्हाण (आत्मचरित्र) - प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे, १९८४.
२) ऋणानुबंध, यशवंतराव चव्हाण, प्रस्टीग पब्लिकेशन, पुणे, १९७५
३) महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, पाटील विठ्ठलराव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २००२.
४) यशवंतराव ते विलासराव - मधूकर भावे, १० जानेवारी २००८.
५) महाराष्ट्र संचार - जाधव विठ्ठलराव (संपा.), स्व.यशवंतराव चव्हाण विशेषांक, मार्च १९९६.
६) यशवंतराव चव्हाण - राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५.
७) सारता समर्थ विशेषांक, यशवंतराव चव्हाण गुणगौरव संपा.अ.क. प्रकाशक, समर्थ प्रकाशन, सातारा, मे १९८५.
८) सह्याद्रीचे वारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, म.रा. मुंबई, १९८८.

Scanned with OKEN Scanner